**म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र.०५/२०२५**

**राखी जोंधळे+१ वि. निखिल जोंधळे**

**MHWR090001822025**

दाखल दिनांक : ०४/०३/२०२५

नोंदणी दिनांक : ०४/०३/२०२५

निकाल दिनांक : ०४/०४/२०२६

कालावधी : ०१ व. ०१ म. ०१ दि.

**निशाणी क्र.** १८

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कारंजा (घा.), जि. वर्धा यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी – श्रीमती दिक्षा दि. विघ्ने)**

**म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र.०५/२०२५**

१. **सौ. राखी निखील जोंधळे,**
वय २८ वर्षे, धंदा – काही नाही,

२. **कु. वंश निखील जोंधळे,**
वय ८ वर्षे, धंदा – शिक्षण,
दो. राह.c/o दिवाकर खडसे,
ता. कारंजा घा, जि. वर्धा, ... **अर्जदार**

**– विरुध्द –**

**श्री. निखील संजयराव जोंधळे,**
वय – ३० वर्षे , व्यवसाय– रोजमजुरी,
राह. करजगाव, ता. चांदूरबाजार,
जि. अमरावती, ... **गैरअर्जदार**

---

अर्जदारातर्फे – श्रीमती के. पी. नासरे वकील

गैरअर्जदारतर्फे – श्री. ए. पी. पराडकर वकील

---

**अर्जः**– कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ सह १८, १९, २० व २२ प्रमाणे

---

**न्यायनिर्णय**

**(घोषित ०४/०४/२०२६)**

प्रस्तूतचा अर्ज अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ सह १८, १९, २० व २२ प्रमाणे गैरअर्जदाराविरुध्द दाखल केला आहे.

२. अर्जदार हिचे अर्जातील कथने थोडक्यात अशी आहेत की, दिनांक १२.०६.२०१६ रोजी अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार यांचे पारंपारीक रितीरिवाजाप्रमाणे लग्न झाले. लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदारकडे नांदायला गेली. नांदायला गेल्यावर तिला माहित पडले की, गैरअर्जदाराला दारू पिण्याचे व्यसन आहे. परंतू आज न उदया गैरअर्जदाराची दारू सुटेल या आशेने ती गैरअर्जदारासोबत नांदत होती. या वैवाहिक संबंधातून अर्जदार क्र.२ याचा दिनांक ०३.०९.२०१७ रोजी जन्म झाला व त्याचे नाव वंश ठेवण्यात आले. बाळ पोटात असतांना योग्य उपचार न घेतल्यामुळे मुलगा थोडा अंपग जन्माला आला.

३. अर्जदार पुढे कथन करते की, गैरअर्जदार हे अर्जदार क्र.१ च्या चारित्र्यावर संशय घ्यायचे. तसेच त्यांच्या वैवाहीक संबंधातुन जन्माला आलेला अर्जदार क्र.२ हा "मुलगा माझा नाही, तो कोणाचा आहे माहिती नाही" असे म्हणायचा. तसेच सप्टेंबर–२०१६ मध्ये मौजा करजगांव येथे गैरअर्जदार दारू पिवून घरी आला. त्यावेळेस अर्जदार ही तिच्या ननदची बकरी सोडून बाहेर हाकलत होती त्यावेळेस वारा आल्याने तिच्या अंगावरील ड्रेस हवेत वरती उडाला. त्या घटनेवरून गैरअर्जदाराने अर्जदार क्र.१ शी वाद घालून तिला अश्लील व अवाछ भाषेत शिवीगाळ करून बेदम शारीरिक मारहाण केली. तसेच

स्वताच्या पायातील चप्पल काढून अर्जदार क्र.१ ला मारले व ओढत आणून राहत्या घरात कोंडून दिले होते. त्या मारहाणीमुळे अर्जदार क्र.१ ला गंभीर स्वरूपाची दुखापत झाली होती. पंरतू नव–यासोबत नांदायचे असल्यामुळे तिने या घटनेविषयी कुठेही सांगीतले नाही. तसेच अर्जदार पुढे कथन करते की, डिसेंबर–२०१७ मध्ये रात्री ८ वाजताच्या दरम्यान नागपूर येथे अर्जदार व गैरअर्जदार हे कामानिमित्त किरायाचे घरी राहत होते. त्यावेळेस अर्जदार क्र.१ ही भांडी धुण्याचे काम करायची. घटनेच्या दिवशी तिला घरी पोहोचायला थोडा उशीर झाला. घरी आल्यानंतर गैरअर्जदाराने अर्जदार क्र.१ ला दारू पिण्यासाठी पैसे मागितले, परंतू अर्जदार क्र.१ ने पैसे नसल्याचे सांगितल्याने गैरअर्जदाराने तिच्याशी वाद घातला. त्याने अर्जदार क्र.१ ला अश्लील भाषेत शिवीगाळ करून बेदम शारिरीक मारहाण केली, कंबरेचा पट्टा काढून त्या पट्टयाने अर्जदाराच्या पाठीवर, पायावर व हातावर मारले. त्यामुळे तिच्या पाठीवर, पायावर आणि हातावर व्रण उमटले होते. सदर घटनेची तक्रार तिने पोलीस स्टेशन सोनेगांव येथे दिली होती. त्यावेळेस पोलीसांनी गैरअर्जदाराला पोलीस स्टेशनला बोलवून समज देवून सोडले होते.

४. अर्जदार पुढे कथन करते की, सन–२०१९ या वर्षी गैरअर्जदाराने अर्जदार क्र.१ चे सोन्याचे मंगळसुत्र गहाण ठेवले व अज्ञापही सोडवून आणले नाही व अर्जदाराला परतही केले नाही. तसेच वर्ष २०२० साली उन्हाळाच्या दिवसामध्ये गैरअर्जदाराच्या त्रासापाई अर्जदारांना पोलीसांनी तिच्या माहेरी आणून सोडले. तेव्हा पासून ते अर्जदार क्र.१ हिच्या आई वडीलांच्या दयेवर कसे बसे जिवन जगत आहे. गैरअर्जदार हे अर्जदारांना कुठलीही आर्थीक मदत करायला तयार नाही. त्यामुळे अर्जदार क्र.१ व तिचा अपंग मुलगा अर्जदार क्र.२ यांना आर्थीक छळाला समोरे जावे लागत आहे. त्यामुळे अर्जदार क्र.१ हीला तिच्या मुलाचे पालणपोषण करण्यास मानसिक व आर्थीक त्रास सहन करावा लागत आहे.

५. अर्जदार पुढे कथन करते की, गैरअर्जदाराने दुस–या मुलीशी लग्न केले असून तो अर्जदार क्र.१ हिला घटस्फोट दयायला तयार नाही. गैरअर्जदाराने मौजा लाखनवाडी येथे दुस–या मुलीशी लग्न केले व त्या लग्नाचे फोटो अर्जदाराने दाखल केले आहे. अर्जदार ही सन २०२० पासून तिच्या आई वडीलांच्या घरी मौजा गवंडी येथे राहत आहे. तिला स्वतःचे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. ती पुर्णतः गैरअर्जदारावर अवलंबून आहे. परंतू गैरअर्जदार हा त्याची नैतीक जबाबदारी पार पाडण्यास टाळाटाळ करीत आहे. गैरअर्जदाराजवळ वडीलोपार्जित शेती असून दरसाल खर्च वजा दोन लाख रूपये उत्पन्न कमावितो. तसेच रोज मजूरीच्या कामावरून पाचशे रूपये रोज कमावितो. तसेच मौजा करजगांव येथे त्याचे पक्के बांधकाम झालेले घर आहे. त्यामुळे अर्जदाराने गैरअर्जदाराविरूध्द संरक्षण आदेश, निवासी व्यवस्थेचा आदेश तसेच नुकसान भरपाईचा आदेश मिळण्यासाठी सदर प्रकरण दाखल केले आहे.

६. सदर अर्ज दाखल झाल्यानंतर गैरअर्जदाराविरूध्द नोटीस काढण्यात आला. सदर नोटीस गैरअर्जदारावर तामिल होवून दिनांक ०८.०४.२०२५ रोजी ते प्रकरणात हजर झाले. त्यानंतर वारंवार संधी देवून सुध्दा गैरअर्जदाराने त्याचे लेखी उत्तर दाखल केले नाही. त्यामुळे दिनांक १९.०६.२०२५ रोजी गैरअर्जदाराविरूध्द विनालेखी उत्तर आदेश पारीत करण्यात आला. त्यानंतर अर्जदाराने नि.क्र.८ वर तिचे शपथेवरील सरतपास दाखल केले. परंतू गैरअर्जदाराने तिचा उलटतपास घेतला नाही. त्यामुळे दिनांक ०८.०१.२०२६ रोजी गैरअर्जदाराचा उलटतपास घेण्याचा अधिकार बंद करण्यात आला. सदर प्रकरणामध्ये दिनांक २५.०८.२०२५ रोजी नि.क्र.१४ व १५ वर गैरअर्जदाराने विनालेखी उत्तर आदेश रद्द होण्यासंबंधी तसेच लेखी उत्तर दाखल करण्यासंबंधी अर्ज दिला होता. सदर अर्ज खर्च बसवून मंजूर करण्यात आले होते. परंतू गैरअर्जदाराने त्यानंतर सदर खर्चाची पुर्तता केली नाही व त्यानंतर कधीही तारखेवर प्रकरणात हजर राहले नाही. त्यामुळे आदेशाची पुर्तता

न केल्यामुळे ती स्थिती बदलवून प्रकरण पुढे चालविण्याचा आदेश दिनांक २३.१२.२०२५ रोजी करण्यात आला. वारंवार संधी देवून सुध्दा गैरअर्जदाराने त्याचे लेखी उत्तर प्रकरणात दाखल केले नाही तसेच अर्जदाराचा उलटतपास सुध्दा घेतला नाही.

७. अर्जदाराचे कथन व अर्जदाराच्या विधीज्ञांचा युक्तिवाद यावरून माझ्या समक्ष खालील मुद्दे उपस्थीत होतात. त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | गैरअर्जदार याने अर्जदार क्र.१ चा कौटुंबिक छळ केला आहे, असे अर्जदार सिध्द करते काय? | **...होय...** |
| **२.** | अर्जदार ही कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण मिळण्यास पात्र आहे काय ? | **... होय...** |
| **३.** | अर्जदार क्र.१ ही दरमहा स्वतःचे व अर्जदार क्र.२ याच्या पालनपोषना करीता दरमहा ६,०००/– रूपये पोटगी मिळण्यास तसेच निवासी व्यवस्था म्हणून दरमहा २०००/– रूपये मिळण्यास पात्र आहे काय? | **अंशतः होय**<br>**दरमहा पोटगी ६,०००/– रूपये व घरभाडे रूपये १,०००/– दरमहा मिळण्यास पात्र आहे.** |
| **४.** | अर्जदार ही नुकसान भरपाई म्हणून रूपये ५,००,०००/– मिळण्यास पात्र आहे काय ? | **अंशतः होय**<br>**(गैरअर्जदार कडून रक्कम रुपये १०,०००/– )** |
| **५.** | अर्जदार ही गैरअर्जदाराच्या नावाची टी.सी., आधार कार्ड, कास्ट सर्टिफिकेट आणि ईतर संबंधीत कागदपत्रे अर्जदार क्र.२ याचे शिक्षणाकरीता मिळण्यास पात्र आहे काय ? | **...होय...** |

| | | |
|---|---|---|
| ६. | आदेश काय ? | **...अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीता–**

८. सदर मुद्दयामध्ये अर्जदार क्र.१ ला हे सिध्द करणे गरजेचे आहे की, ती गैरअर्जदारसोबत एकत्र कुटूंबात नांदत असतांना तिच्यावर कौटूंबिक हिंसाचार करण्यात आला. सदर बाब सिध्द करण्यासाठी अर्जदाराने स्वतःला साक्षदार क्र.१ म्हणून नि.क्र.८ वर तपासले. तिने तिच्या समर्थनार्थ नि.क्र.१० ते १३ वर व वस्तुचिन्ह अ, ब, क वर तिच्या व गैरअर्जदाराच्या लग्नाची पत्रीका, तिचे व अर्जदार क्र.२ चे आधार कार्डची प्रत, गैरअर्जदाराचे दुस–या लग्नाची छायाचित्रे, भुमापन क्र.२१ चा सातबारा उताराची प्रत दाखल केली आहे. तसेच नि.क्र.९ वर मत्ता व दायित्वाचे विवरण पत्र सुध्दा दाखल केले आहे. याउलट गैरअर्जदाराने संधी देवून सुध्दा लेखी उतर दाखल केले नाही. तसेच अर्जदाराचा उलटतपास सुध्दा घेतलेला नाही. सदरचा अर्ज संरक्षण अधिकारी यांच्यामार्फत दाखल करण्यात आला आहे. तसेच अर्जदाराने तिचा पुरावा शपथेवर दिला आहे. तिने तिच्या पुराव्यात कथन केले की, गैरअर्जदार याला दारूचे व्यसन आहे व त्यामुळे तो अर्जदार क्र.१ व २ यांच्याकडे दुर्लक्ष करतो. सोबतच तिने सांगितले की, सप्टेंबर २०१६ मध्ये गैरअर्जदार दारू पिवून आला तेव्हा ती बकरी हाकलत असतांना तीचा ड्रेस हवेने वर उडाला या कारणावरून गैरअर्जदाराने तिच्याशी वाद केला व शिवीगाळ करून पायातली चप्पल काढून मारहाण केली व ओढत नेवून घराबाहेर काढले. तसेच डिसेंबर २०१७ मध्ये रात्री ८ वाजता ते नागपूर येथे राहत असतांना अर्जदार भांडी धुण्याचे काम करायची. त्यामुळे तिला थोडा उशीर झाला तेव्हा गैरअर्जदाराने दारू पिण्यासाठी पैसे मागितले व तिने पैसे दिले नाही त्यामुळे गैरअर्जदाराने कंबरेचा पट्टा काढून पट्टयाने तिला मारहाण केली. तेव्हा तिने पोलीस स्टेशन सोनेगांव येथे तक्रार दिली होती. परंतू पोलीसांनी

त्यांला समज देवून सोडले. तसेच सन २०१९ साली अर्जदाराचे सोन्याचे दागीने गैरअर्जदाराने गहाण ठेवले परंतू सोडवून आणले नाही. त्यानंतर २०२० मध्ये पोलीसांनी तिला व तिच्या मुलाला माहेरी आणून सोडले आणि तेव्हा पासून दोन्ही अर्जदार हे अर्जदार क्र.१ च्या आई वडीलांकडे राहत आहे. तेव्हा पासून अर्जदाराला मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. याउलट गैरअर्जदाराने दुस–या मुलीशी लग्न केले असून तो अर्जदार क्र.१ ला घटस्फोट दयायला तयार नाही. गैरअर्जदारावर दोन्ही अर्जदारांची पालनपोषणाची जबाबदारी असतांना सुध्दा तो टाळाटाळ करीत आहे, असे कथन केले आहे.

९. अर्जदाराने तिचा पुरावा शपथेवर दिला आहे. गैरअर्जदाराने त्याचे लेखी उत्तर दाखल न केल्यामुळे व अर्जदाराचा उलट तपास न घेतल्यामुळे अर्जदार क्र.१ चे शपथेवरील कथन बिनविरोध राहीले. तसेच सदर प्रकरण संरक्षण अधिकारी यांच्या मार्फत दाखल करण्यात आले. त्यामध्ये सुध्दा संरक्षण अधिकारी यांच्या घटनाचौकशी अहवालमध्ये अर्जदार क्र.१ हिच्या पुराव्यातील कथन दिसून येत आहे. यावरून असे दिसते की, गैरअर्जदाराला दारूचे व्यसन असून तो अर्जदार क्र.१ हिला शिवीगाळ व मारहाण करतो. सोबतच अर्जदाराने वस्तुचिन्ह अ ते क वर तिन छायाचित्रे सिध्द केली आहे. गैरअर्जदाराने दुस–या मुलीशी दुसरा विवाह केल्याबाबतचे ते छायाचित्र असल्याचे अर्जदाराने शपथेवर सांगितले आहे. तिच्या कथनाला कोणताही विरोध आलेला नाही. त्यामुळे तिचे शपथेवरील कथन बिनविरोध असून ते खरे असल्याचे दिसून येते. अर्जदाराने दाखल केलेल्या लग्नपत्रीकेवरून दिसून येते की, अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार यांचा विवाह दिनांक १२.०६.२०१६ रोजी झाला होता. त्यानंतर ती गैरअर्जदाराकडे एकत्र कुटूंबात मौजा करजगांव येथे नांदायला गेली असल्याचे सिध्द होते. एखादया स्त्रीला एकत्र कुटूंबात नांदत असतांना दारू पिवून शिवीगाळ करणे व मारहाण करणे हे तिच्यावर होत असलेला कौटूंबिक हिंसाचार आहे. त्या त्रासाला कंटाळून जेव्हा अर्जदार क्र.१ आपल्या माहेरी राहत आहे व सदर प्रकरण

दाखल केले आहे अश्यावेळेस गैरअर्जदाराने दुस–या मुलीशी दुसरा विवाह केल्याचे सुध्दा दिसून येते. पत्नी जिवंत असतांना व घटस्फोट झाला नसतांना सुध्दा गैरअर्जदाराने दुस–या स्त्रीशी लग्न करणे हा सुध्दा अर्जदार क्र.१ वर करण्यात आलेला मानसिक हिंसाचार आहे. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार केला असता, हे सिध्द होते की, गैरअर्जदाराने अर्जदारावर कौटूंबिक हिंसाचार केला आहे. सबब मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी दर्शविते व त्याप्रमाणे निष्कर्ष देते.

**मुद्दा क्र. २ करिताः–**

१०. सदर प्रकरणात गैरअर्जदार याने अर्जदार क्र.१ चा शारीरीक व मानसिक छळ करुन कौटुंबिक हिंसाचार केला असल्याचे मुद्दा क्र.१ वरून सिध्द झाले आहे. अश्या वेळेस तिच्यावर होत असलेला कौटुंबिक हिंसाचार संरक्षण आदेश पारीत करून थांबविणे न्यायोचित होईल. सबब मी मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी दर्शवून त्याप्रमाणे निष्कर्ष देत आहे.

**मुद्दा क्र. ३ करिताः–**

११. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे तिच्या जवळ कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. तसेच अर्जदार क्र.२ म्हणजेच अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार यांचा मुलगा वंश हा सुध्दा अर्जदार क्र.१ हिच्या सोबत राहतो व त्याला शारीरिक अंपगत्व आहे. याउलट गैरअर्जदाराजवळ वडिलोपार्जित शेती असून त्यासंबंधी नि.क्र.१३ वर भुमापन क्र.२१ च्या सातबारा उता–याचे प्रत दाखल केली आहे. परंतू त्या सातबारा उता–याची पडताळणी केली असता त्यामध्ये गैरअर्जदार निखील संजयराव जोंधळे किंवा त्याचे वडील संजयराव जोंधळे यांच्या नावाचा कुठेही उल्लेख नाही असे दिसून येते. सदर सातबारामध्ये ओंकार शंकरराव जोंधळे, अन्नपूर्णा प्रल्हादराव जोंधळे, तुळशीराम अमराजी जोंधळे व सुखदेवराव अमराजी जोंधळे यांच्या नावाचा उल्लेख दिसून येतो परंतू त्यांचा गैरअर्जदारासोबत कोणते

नाते संबंध आहे या संबधी कोणताही पुरावा आलेला नाही. त्यामुळे गैरअर्जदाराजवळ वडीलोपार्जित शेती असल्याबाबत कोणताही लेखी पुरावा दिसून येत नाही.

१२. गैरअर्जदारा जवळ वडीलोपार्जित शेती असल्याबाबत कोणताही दस्ताऐवजीय पुरावा दिसून येत नाही परंतू याचा अर्थ असा नाही की, त्याच्यावर अर्जदाराची जबाबदारी नाही. अर्जदार क्र.१ हिचे पती म्हणून व अर्जदार क्र.२ यांचे पिता म्हणून त्यांच्या पालनपोषणाची संपूर्ण जबाबदारी गैरअर्जदाराची आहे. अर्जदार ही सन २०२० पासून आपल्या माहेरी राहत आहे. सदर कालावधीत गैरअर्जदाराने अर्जदारांना कोणतीही आर्थीक मदत केली असल्याबाबत दिसून येत नाही. त्यामुळे गैरअर्जदार आपली जबाबदारी पूर्ण करण्यास टाळाटाळ करीत असल्याबाबत दिसून येते. गैरअर्जदार हा शरीराने सुदृढ असून मजूरीचे काम करतो. सध्या अकुशल कामगारांना दररोज किमान वेतन ५५०/– रूपये मिळते. परंतू करजगाव सारख्या गावांमध्ये गैरअर्जदाराला दररोज काम मिळणे शक्य नाही त्यामुळे त्याला दरमहिन्याला किमान विस दिवस काम मिळत असेल असे गृहीत धरल्या जाते. यावरून असे दिसते की, दररोज ५५०/– रूपये प्रमाणे दर महिन्याला तो किमान ११,०००/– रूपये कमावितो. अर्जदारा व्यतिरीक्त गैरअर्जदारावर इतर कुणाचीही जबाबदारी असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अर्जदार क्र.१ व २ यांच्या पालनपोषणाकरीता व अर्जदार क्र.२ यांच्या शालेय शिक्षणाकरीता गैरअर्जदार याने दरमहा सहा हजार रूपये पोटगी देण्याचा आदेश करणे न्यायोचित होईल.

१३. अर्जदार ही सध्या तिच्या आई वडीलाकडे मौजा गवंडी येथे राहत आहे. गैरअर्जदार याचे मौजा करजगाव येथे पक्के बांधकाम असलेले घर आहे. परंतू अर्जदारावर त्या ठिकाणी कौटूंबिक हिंसाचार करण्यात आला व पुन्हा त्याच ठिकाणी राहण्याचा आदेश केला असता तिच्यावर पुन्हा कौटूंबिक हिंसाचार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अर्जदाराला गैरअर्जदाराच्या मौजा

करजगाव येथील घरात राहण्याचा आदेश करणे योग्य होणार नाही. त्यामुळे अर्जदाराला पर्यायी व्यवस्था म्हणून घर भाडयाची रक्कम रूपये एक हजार प्रति माह देण्याचा आदेश करणे योग्य होईल. सबब मी मुद्दा क्र.३ चे उत्तर अशंतः होकारार्थी दर्शविते व त्याप्रमाणे निष्कर्ष नोंदविते.

**मुद्दा क्र.४ करिता :–**

१४. अर्जदाराने तिच्या पुराव्यावरून सिध्द केले की, गैरअर्जदार याने एकत्र कुटूंबात नांदत असतांना तिच्यावर कोटूंबिक हिंसाचार केला आहे. त्यामुळे तिच्यावर झालेल्या हिंसाचारापोटी ती नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे. परंतू तिने मागणी केलेली नुकसान भरपाईची रक्कम संयुक्तिक दिसून येत नाही व ती एवढी नुकसान भरपाईची रक्कम मिळण्यास कश्या पध्दतीने पात्र आहे याबाबत कोणताही पुरावा आलेला नाही. त्यामुळे अर्जदार हिला रूपये ५,००,०००/– नुकसान भरपाईचा आदेश करणे न्यायोचित नाही. अर्जदार ही गैरअर्जदारासोबत नांदत असतांना गैरअर्जदारांच्या कौटूंबिक हिंसाचारामुळे अर्जदाराचे कोणतेही आर्थीक नुकसान झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अर्जदारावर झालेल्या कोटूंबिक हिंसाचारापोटी तिच्या लग्नानंतरच्या परिस्थिती नुसार तिला १०,०००/– रूपये नुकसान भरपाई मिळणे योग्य होईल. सबब वरील कारणास्तव मी मुद्दा क्र.४ चे उत्तर अंशतः होकारार्थी दर्शविते व त्याप्रमाणे निष्कर्ष देते.

**मुद्दा क्र.५ करिता :–**

१५. सदर मुद्यामध्ये अर्जदाराने गैरअर्जदाराच्या नावाची टिसी, आधारकार्ड, कास्ट सर्टिफिकेट आणि ईतर संबंधीत दस्ताऐवजाची मागणी केली आहे. अर्जदाराच्या पुराव्यावरून असे दिसते की, अर्जदार क्र.२ वंश हा अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार यांच्या वैवाहिक संबंधातून जन्माला आलेला मुलगा आहे. साहजिकच त्याच्या शैक्षणिक कामाकरिता पिता म्हणून गैरअर्जदार यांच्या नावाचे

दस्ताऐवजाची गरज भासणार आहे. त्यामुळे अर्जदार हे अर्जदार क्र.२ याच्या शिक्षणाकरीता गैरअर्जदार यांच्या नावाची टि.सी., आधारकार्ड, कास्ट सर्टिफिकेट आणि इतर संबंधी कागदपत्रे मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.५ चे उत्तर होकारार्थी दर्शविते व त्याप्रमाणे निष्कर्ष देते.

**मुद्दा क्र.६ करिता :-**

१६. मुद्दा क्र.१ ते ५ च्या कारणमिमांसा व निष्कर्षांचा विचार करता मुद्दा क्र.६ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदार याला आदेशीत करण्यात येते की, त्याने अर्जदार हिचा कोणत्याही प्रकारे कौटुंबिक हिंसाचार करु नये तसेच संरक्षण अधिकारी/पोलीस अधिकारी यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जदाराला आवश्यकता असल्यास संरक्षण द्यावे.

३. गैरअर्जदार याला आदेशीत करण्यात येते की, त्याने अर्जदार क्र.१ व २ यांच्या पालपोषणाकरीता पोटगी म्हणून दरमहा ६,०००/- रूपये एवढी रक्कम अर्ज दाखल तारखेपासुन अदा करावी.

४. गैरअर्जदार याला आदेशीत करण्यात येते की, त्याने अर्जदार क्र.१ व २ यांना पर्यायी निवासी व्यवस्थेकरीता दरमहा १,०००/- रूपये घरभाडयाची रक्कम अर्ज दाखल तारखेपासुन अदा करावी.

५. गैरअर्जदार याला आदेशीत करण्यात येते की, त्याने अर्जदार क्र.१ हिला नुकसान भरपाईची रक्कम १०,०००/- रूपये आदेश तारखेच्या तीन महीण्याच्या आत अदा करावी.

६. गैरअर्जदाराला आदेशीत करण्यात येते की, अर्जदार क्र.२ याला शालेय कामकाजाकरीता लागणारे गैरअर्जदारांची आवश्यक दस्ताऐवज मागणी केल्याप्रमाणे देण्यात यावे.

७. संरक्षण अधिकारी व संबंधीत पोलीस स्टेशन अधिकारी यांनी अर्जदाराला वरील आदेशाची पुर्तता करण्यास सहकार्य करावे.

८. अर्जदार, गैरअर्जदार व संरक्षण अधिकारी यांना या न्यायनिर्णयाची प्रत मोफत देण्यात यावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित व पारीत करण्यात येते.)**

DIKSHA DINESH VIGHNE
Digitally signed by DIKSHA DINESH VIGHNE
Date: 2026.04.08 11:05:32 +0530

दिनांक ०४/०४/२०२६

ठिकाण : कारंजा (घा.)

**(दिक्षा दि. विघ्ने)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,कारंजा (घा.)

जि. वर्धा